REGISTERED No. B 3434

# अर्थ

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १८ सप्टेंबर, १९४० अंक ३८

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

## विविध माहिती

**बचत करा, सरकारास कर्ज द्या**

" सतत काटकसर करून पैशाची बचत करा व सरकारास कर्ज द्या. कर्जांची तुलनात्मक आकर्षकता बचत बसण्याचा हा समय नाहीं " असें ब्रिटिश फडनवीस, सर किंग्जले वुड, हे आपल्या एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

**अहमदाबादी कापडाची विक्री**

अहमदाबाद मधून दर ऑगस्टमध्यें सरासरी ४५ हजार गाठी तयार कापड बाहेर जातें, असा अनुभव आहे. गेल्या ऑगस्टमध्यें, ६८ हजार गाठींचा उठाव झाला.

**कोयनेलची खरेदी**

जाव्हामधून कोयनेल विकत घेण्याकरितां मध्यवर्ती स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें ८५ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. युद्धपरिस्थितींत कोयनेलचा भरपूर पुरवठा असणें अत्यंत आवश्यक आहे.

**टांकसाळीकरितां खर्च मंजूर**

सध्या रुपये व त्या खालील कमी किंमतीचीं नाणीं त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँक नोटा ह्यांस मागणी वाढली आहे. त्यासाठी हिंदी टांकसाळीकरितां ८५ लक्ष रुपये मध्यवर्ती स्टँडिंग कमिटीनें मंजूर केले आहेत.

**ट्रेझरी बिलांवर १० आ. ९ पै व्याजाचा दर**

११ सप्टेंबर रोजीं रिझर्व्ह बँकेनें २ कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ९ पै पडला.

**कोचीन बंदर**

कोचीन येथें पोर्ट ट्रस्ट असणें आवश्यक आहे, असें कोचीन युरोपियन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नुकतेच म्हणाले. कोचीनसारखें मोठें बंदर सल्लागार कमिटीच्या नियंत्रणाखाली असणें बरोबर नाहीं, असेहि उद्‌गार त्यांनीं काढले.

**हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न**

एप्रिल ते ऑगस्ट ह्या पांच महिन्यांत हिंदी रेल्वेजचें उत्पन्न ४२ कोटि,२५ लक्ष रुपये झालें. मागील वर्षाच्या ह्याच अवधींतल्या उत्पन्नापेक्षा हा आकडा ४ कोटि, १९ लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

**हिंदी शेंगदाणा व आळशी ह्यांची ब्रिटिश खरेदी**

इंग्लंडमधील अन्नसामुग्रीच्या सरकारी खात्यानें हिंदी शेंगदाणा आणि आळशी ह्यांची खरेदी अनुक्रमें करून दर टनास १० पौंड व १२३ पौंड या भावानें चालवली आहे. ह्या भावांत कांहीं बदल होईल तेव्हां त्याची माहिती जाहीर रीतीनें दिली जाईल.

**मुंबई कॉर्पोरेशन ४८ लक्ष रुपयांचें कर्ज घेणार**

आपले निरनिराळे फंड गुंतविण्यासाठी मुंबई कॉर्पोरेशन ४८ लक्ष रुपयांचें कर्ज घेणार आहे.

**तांबड्या समुद्राचा मार्ग सुरक्षित**

ब्रिटिश सोमालीलँड इटलीच्या ताब्यांत गेला असला तरी तांबड्या समुद्रामध्यें ब्रिटिशांचें वर्चस्व अबाधित आहे. सैनिक व सामान घेऊन जाणाऱ्या आगबोटी ह्या समुद्रांतून सुरक्षितपणानें मुक्कामाला गेल्या, ह्यावरून त्या बाजूकडे इटली निष्क्रिय आहे हें स्पष्ट होतें.

**दुकानांत कामावर असलेल्या नोकरांविषयीं बंगाली कायदा**

दुकानांत कामावर असलेल्या नोकरांच्या कामाचें नियंत्रण करणारा कायदा बंगालच्या कायदेमंडळानें मान्य केला आहे.

**१ नोव्हेंबरपासून सक्ती**

युद्धविषयक विम्याच्या सक्तीची योजना १ ऑक्टोबर रोजीं अमलांत येईल व १ नोव्हेंबर पासून सर्व ब्रिटिश हिंदुस्थानांत तो विमा सक्तीनें उतरावा लागेल.

**युद्धविषयक धोक्याचा विमा**

वॉर रिस्क ( गुड्स ) इन्शुअरन्सच्या सरकारी योजनेप्रमाणें मध्यवर्ती सरकारचे एजंट म्हणून १०७ कंपन्यांचीं नांवें जाहीर करण्यांत आलीं आहेत.

**जर्मन अधिकाऱ्यांचा हुकूम**

ब्रिटिश अगर इतर कोणत्याहि देशाचे ब्रॉडकास्ट ऐकण्यास बेल्जममधील लोकांस जर्मन अधिकाऱ्यांनीं बंदी केली आहे.

**अमोनियम क्लोराइड**

अमोनियम क्लोराइडचें उत्पादन आतां हिंदुस्थानांत होऊं लागलें आहे. पंजाबांत दोन ठिकाणीं तें होत आहे.

**कौन्सिल ऑफ स्टेटची बैठक**

कौन्सिल ऑफ स्टेटच्या नवी दिल्ली येथील येत्या बैठकीस ता. १० नोव्हेंबर रोजीं प्रारंभ होईल.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि.**

३१ मे, १९४० अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस १३,०६५ रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागांवर ९% प्रमाणें इनकम टॅक्ससहित डिव्हिडंड देण्यास ८,४०८ रुपये लागतील, त्याची निमी रकम ( ४,२०४ रु. ) राष्ट्रीय शिक्षण मंडळास मिळेल.

**आयुर्विमा कंपन्यांनीं पैसे कसे गुंतविले ?**

ब्रिटिश आयुर्विमा कंपन्यांचे १९३९ सालीं पैसे कसे गुंतविलेले होते, हें शतमानानें खालीं दाखविलेलें आहे:—

गहाणावर व पॉलिसींवर कर्जे २२·९%, ब्रिटिश सरकारचे रोखे १६·४%, हिंदी व इतर देशांचे सरकारी रोखे ६·९%, ब्रिटिश म्युनिसिपल रोखे: ३·२% हिंदी व इतर देशांतील म्युनिसिपल रोखे १८%, डिबेंचर स्टॉक: १८·८%, प्रेफरन्स व गॅरंटीड स्टॉक: ९·४% ऑर्डिनरी स्टॉक: ९·२%, मालमत्ता वगैरे: १०·३%.

**अपघातास पादचारी लोकच कारण**

चालू वर्षी आतापर्यंत मुंबई शहरांतील रस्त्यांवरील अपघातांत मृत्यु आले, त्यांच्या मूळ कारणाचें संशोधन केलें असतां दोषांची शतमानानें वांटणी खालीलप्रमाणें होते:—

मोटारीचा वेग: ३·६%

ड्रायव्हरचा निष्काळजीपणा: ७·१%

सदोष ब्रेक: १·६%

पादचाऱ्यांचा निष्काळजीपणा: ५८·९%

सायकलवाल्यांचा निष्काळजीपणा: ७·१%

हातगाडीवाल्या मजुरांचा निष्काळजीपणा: ३·६%

अंधुक प्रकाश, वगैरे: ७·१%

इतर: ११%

म्हणजे, रस्त्यावरील अपघातांमधील सेकडा ६० मृत्यूंस पादचारी लोकांचाच निष्काळजीपणा कारण असतो असा अर्थ झाला.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४४६ |
| २ हिंदी कच्चा माल आणि देशी धंद्यांचा विस्तार | ४४७ |
| ३ पैशाच्या हालचालींबाबत सराफांस सवलती ... | ४४८ |
| ४ स्फुट विचार ... स्थावर मालमत्ता आणि प्राप्तीवरील कर—युद्धाच्या हालचाली—जर्मन विमानांचे लंडनमधील अत्याचार— | ४४९ |
| ५ युद्धांतील यशाचें रहस्य | ४५१ |
| ६ मुंबई प्रांताची औद्योगिक प्रगति कशी होईल ? | ४५१ |
| ७ औद्योगिक प्रगतीची संधी ... ... | ४५३ |
| ८ सहकारी बँकांचे अहवाल | ४५४ |
| ९ निवडक बाजारभाव | ४५५ |

**अर्थ**

बुधवार, ता. १८ सप्टेंबर, १९४०

# हिंदी कच्चा माल आणि देशी धंद्यांचा विस्तार

### दोन सल्लागार समित्यांच्या सभा

हिंदुस्थानाच्या विपुल कच्च्या मालाचा उपयोग युद्धसामुग्री बनवण्याकडे कसा करतां येईल हा जिव्हाळ्याचा व निकडीचा प्रश्न आज हिंदी धंदेवाले आणि सरकार ह्यांचे पुढें आहे. त्याचें महत्त्व दुहेरी आहे. हिंदी कच्च्या मालाचें परराष्ट्रीय गिऱ्हाइक युद्धामुळें मर्यादित झालें आहे आणि ह्या कारणानें त्याचे भाव पडून व्यापारास व शेतीच्या धंद्यास मंदीची झळ लागणें स्वाभाविक आहे. ह्या कच्च्या मालाचा उपयोग देशी कारखान्यांत करून त्यास मागणी उत्पन्न होईल अशी तजवीज करणें आणि त्याचबरोबर युद्धसामुग्रीच्या उत्पादनास सहाय देणें हा दुहेरी उद्देश साधणें हा या मंदीवरचा व्यावहारिक उपाय आहे. अनेक जातींचा जरूरीचा माल पूर्वीप्रमाणें युद्धपरिस्थितींत हिंदुस्थानांत आयात होणें अशक्य आहे. वहातुकीच्या साधनांची काटकसर होऊन त्यांचा उपयोग अधिकांत अधिक युद्ध यशस्वी करण्याकडे केला जाणें अगत्याचें आहे. विविध जातींच्या कच्च्या मालापासून नवीन तऱ्हांचा पक्का माल बनवणें पूर्वतयारी वांचून अवघड आहे हें उघड आहे. ह्यास शास्त्रीय शोधाची आवश्यकता असून तें कालावधीचें काय असतें. तथापि ह्या बाबतींत दीर्घ कालक्षेपास सवड नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें शास्त्रीय व औद्योगिक सल्ला देण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमली हें धोरण अभिनंदनीय आहे. ह्या समितीनें निरनिराळ्या धंद्यांविषयींचे प्रश्न तातडीनें हातीं घेऊन ते त्वरित निकालांत काढण्याचा प्रयत्न चालवला आहे हें समाधानकारक आहे. ह्या कार्यक्रमाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे आणि त्याची प्रगति कशी चालली आहे ह्याची कल्पना शास्त्रीय आणि औद्योगिक सल्लागार समितीच्या वेळोवेळ होणाऱ्या सभांतील चर्चेवरून येण्यासारखी आहे.

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचे मंत्री सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथें वरील समितीची सभा झाली. तीमध्यें झालेल्या चर्चेचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. लोखंडासारख्या धातूंच्या धंद्याचें विशेष महत्त्व ध्यानांत घेऊन समितीनें त्यांचे बाबतींत एक खास उपसमिति नेमली. जमशेदपूर येथील टाटा कंपनीचे जनरल मॅनेजर, मि. गांधी, हे तिचे अध्यक्ष असून सरकारी टाकसाळींचे चीफ केमिस्ट ह्यांस समितीचे सभासद करून घेण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील अनेक जातींच्या गळिताच्या धान्यांस परदेशांत असलेली मागणी कमी झाली असल्यानें त्यांच्या तेलांचा नवीन रीतीनें ह्या देशांतच उपयोग करतां येणें अत्यंत महत्वाचें झालें आहे. ह्याविषयीं संशोधन होण्यासाठी एक स्वतंत्र उपसमिति नेमण्यांत आली होती तिनें केलेल्या सूचनांस मान्यता देण्यांत आली आहे. ज्या अर्थी गळिताचीं धान्यें व त्यांचीं तेलें ह्यांची निर्गत होण्याचे मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत, त्या-अर्थी त्यांची साठवण सुरक्षित रीतीनें होण्याचे उपाय शोधून काढणें जरूर आहे अशी सूचना सर ए. रामस्वामी यांनीं केली ती योग्य आहे. हिंदी गळिताच्या धान्यांपासून काढलेलें तेल हिंदुस्थानांतील कित्येक रेलवेजवर वंगण म्हणून वापरण्यांत येत आहे. हा उपयोग अधिक विस्तृत प्रमाणांत होण्याची व्यवस्था सरकारनें करावी अशी शिफारस त्यांस करण्यांत आली. ह्याच दिशेचा दुसरा प्रयत्न म्हटला म्हणजे लोण्याचे ऐवजीं गळिताच्या पदार्थांपासून बनवलेलें "मार्गरीन" वापरलें जाण्याची तजवीज करणें हा होय. मार्गरीनचा उपयोग कित्येक बाहेरील देशांत होत आहे. तेथें त्या प्रकारच्या हिंदी बनावटीस गिऱ्हाइक मिळवणें आवश्यक आहे. पेंडीच्या वाढत्या वापरास खत व जनावरांचें खाद्य म्हणून उत्तेजन देण्याचें महत्त्व इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या नजरेस आणण्याचेंहि मुंबईच्या सभेंत ठरलें. रेडिओची यंत्रें हिंदुस्थानांत तयार करण्याच्या प्रश्नाचा विचार होऊन त्या संबंधांत तपशीलवार चौकशी उपसमित्यांनीं करावी अशी सूचना मान्य करण्यांत आली. संशोधनाबाबतच्या ह्या सर्व शिफारसी फलद्रूप होण्यास पैसा पाहिजे. त्याच्या पुरवठ्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारच्या फडनवीशी खात्यास विनंति करण्यांत येणार आहे.

हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्र्यांच्या मुंबई येथील मुक्कामांत निर्गत व्यापाराचे संबंधांत नेमलेल्या सल्लागार समितीचीहि सभा गेल्या आठवड्यांत झाली. हिंदी मालाच्या निर्गतीचे बाबतींत येणाऱ्या अडचणींची चर्चा करून सरकारास त्या दूर होण्याविषयीं सूचना करणें हें ह्या समितीचें कार्य आहे. युद्धपरिस्थितींत निरनिराळ्या जातींच्या मालाच्या निर्गतीवर नियंत्रण घालणें प्राप्त होऊन सरकारनें त्या बाबतींत वेळोवेळ हुकूम काढले आहेत. हिंदी बंदरांच्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय हिशेबांत घेऊन ह्या हुकुमांच्या अंमलबजावणीपासून उत्पन्न होणाऱ्या अडचणी दूर करणें आणि हिंदी निर्गत व्यापारास शक्य तेवढें उत्तेजन देणें ह्या गोष्टींचा विचार समितीनें केला. शेतीचा हंगाम जवळ येत चालला आहे आणि कच्च्या मालाच्या हालचालीस लवकर प्रारंभ होणार आहे. ह्या मालाच्या खपाचे नवे मार्ग शोधून काढण्यांत आले नाहींत तर त्याचे बाजारभाव सुधारणार नाहींत आणि शेती व व्यापार ह्यांचेवर मंदीचें पटल पसरेल. ह्यासाठी शेतमालाच्या खपाची तजवीज एव्हांपासून करणें अगत्याचें आहे असा अभिप्राय निर्गत व्यापार सल्लागारसमितीनें व्यक्त केला आणि त्याचा विचार सहानुभूतिपूर्वक सरकार करील असें आश्वासन सर ए. रामस्वामी ह्यांनीं दिलें असें समजतें. शास्त्रीय व औद्योगिक संशोधनसमिति आणि निर्गत व्यापार सल्ला-

गारसमिति ह्यांच्या मुंबईस झालेल्या चर्चेचा त्रोटक वृत्तांत येथें दिला आहे, त्यावरून ह्या दोन मंडळांच्या कार्यांचा परस्पर संबंध किती निकट आहे हें ध्यानांत येईल. हिंदी कच्च्या मालाचा खप वाढून त्यास चांगला भाव येण्यावर देशाची सांपत्तिक परिस्थिति बरीचशी अवलंबून आहे. त्याचप्रमाणें ह्या मालाचा देशी कारखान्यांत उपयोग वाढत्या गतीनें होणेंहि महत्त्वाचें आहे. युद्धपरिस्थितींत ह्या दोन्ही गोष्टी निकडीच्या व जिव्हाळ्याच्या आहेत. त्यांची पद्धतशीर व्यवस्था होण्याकरितां सरकार, धंदेवाले व शास्त्रीय तज्ञ ह्यांचें पूर्ण सहकार्य झालें पाहिजे ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

## पैशाच्या हालचालीबाबत सराफांस सवलती

मोठमोठ्या बँकांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसे पाठवावयाचे असतात त्यासाठी सवलतीच्या दरानें रकमांची देव-घेव होण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें इंपीरिअल बँक ऑफ इंडिया व सरकारी तिजोऱ्या ह्यांच्यामार्फत केलेली आहे. ही सवलत देशी पद्धतीनें बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या सराफांस आजपर्यंत नव्हती. कमी खर्चानें रकमा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणास पाठवण्याची आवश्यकता त्यांसहि भासते. ही त्यांची गरज भागवण्याच्या हेतूनें रिझर्व्ह बँकेनें एक योजना तयार केली आहे आणि ती आतां प्रसिद्ध झाली आहे. ह्या योजनेचा ज्यांस फायदा घ्यावयाचा असेल त्यांना विशिष्ट अटी पाळाव्या लागतील. कर्जें देण्याच्या हेतूनें जे सराफ ठेवी घेतात आणि ( किंवा ) जॉइंट स्टॉक बँकांकडून हुंड्या डिस्कौंट करून घेत असतील, त्यांचीं नांवें एका यादींत दाखल केलीं जातील. व्यापारी बँका ज्याप्रमाणें निवळ बँकिंगच्या जोडीस दुसरे किरकोळ व्यवहार करतात, त्याप्रमाणें सराफांनीं इतर व्यवहार करण्यास हरकत नाहीं; पण त्यांचा मुख्य धंदा बँकिंगचा असावा म्हणजे त्यांचें नांव रिझर्व्ह बँकेच्या यादींत दाखल होण्यास अडचण पडणार नाहीं; परंतु ज्या सराफांचा मुख्य धंदा शेती, दुकानदारी किंवा व्यापार हा आहे आणि दुय्यम व्यवसाय ह्या नात्यानें जे ठेवी स्वीकारतात व कर्जाऊ रकमा देतात, त्यांचीं नांवें ह्या यादींत घातलीं जाणार नाहींत. पसंत व्हावयाच्या सराफाचें स्वतःच्या मालकीचें भांडवल अर्धा लक्ष रुपये इतकें तरी असलें पाहिजे अशीहि अट रिझर्व्ह बँकेनें घातली आहे. ज्या सराफांस सवलती हव्या असतील त्यांनीं स्थानिक ट्रेझरीकडे किंवा सब ट्रेझरीकडे ठराविक फॉर्मवर अर्ज केला पाहिजे आणि जरूर ती माहिती पुरवली पाहिजे. ही माहिती गुप्त राखण्यांत येईल. पैशाच्या अदलाबदलीचे संबंधांत खालीं दिलेले कमिशनचे दर निश्चित करण्यांत आले आहेत:—

सामान्य जनतेसाठीः—पांच हजार रुपयांपर्यंत $\frac{1}{8}$ टक्का ( तारेच्या ट्रान्सफरला किमान १ रुपया आणि ड्राफ्ट व मेल ट्रान्सफरला किमान ४ आणे ). पसंत यादीवरील सराफांसाठीः-पांच हजार रुपयांपर्यंत $\frac{1}{16}$ टक्का. सामान्य जनतेसाठीः-पांच हजारांवरील रकमेस $\frac{1}{16}$ टक्का ( किमान दर ६ रु. ४ आणे ). सराफांसाठीः—पांच हजारांवरील रकमेस $\frac{1}{32}$ टक्का ( किमान दर ३ रु. २ आणे )-तारेनें पैसे पाठवावयाचे असल्यास तारेचा आकार सर्वांस जादा द्यावा लागेल.

---

**ग्राम प्रगति**

मासिक वर्ष ९ वें. वा. व. म. आ. मे २ रु. शेतकऱ्यांचा जीवलग मित्र, ग्रा. पंचा. मार्गदर्शक, ग्रामसंस्थांना उत्साहप्रद, विद्यार्थ्यांना उद्बोधक, व्यापारी मालाचा प्रसारक, मुंबई व मध्यप्रांत विद्याखात्याकडून मंजूर.

श्री. ना. हुद्दार, सं. ४, नागपूर.

दि

# बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा
दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा
डेक्कन जिमखाना

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ) नागपूर ( इतवारी बझार ) पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. केराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टाचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—डी. आर. खारवाणी.

## स्फुट विचार

### स्थावर मालमत्ता आणि प्राप्तीवरील कर

स्थावर मालमत्तेच्या मालकांचें एक शिष्टमंडळ मुंबई येथें मध्यवर्ति सरकाराच्या रेव्हिन्यू बोर्डाचे सभासद, मि. शीही ह्यांच्या भेटीस गेलें होतें. त्या प्रसंगीं घर-मालकांनीं अशी सूचना केली कीं प्राप्तीवरील कराच्या आकारणींत स्थावर मिळकतीवर स्थानिक व प्रांतिक कर देण्यांत येतो, तो खर्च म्हणून प्राप्तीमधून वगळण्यांत यावा. प्रांतिक सरकारनें बसवलेल्या करांमुळें घर मालकांचें उत्पन्न कमी होतें ह्या कारणास्तव तो वजा घालून बाकीच्या रकमेवर प्राप्तीवरील कर आकारणें युक्त होईल असा युक्तिवाद पुढें मांडण्यांत आला असतां त्यास मि. शीहींनीं उत्तर दिलें कीं, त्यांच्या मालमत्तेवर द्यावा लागणारा कर हें प्राप्तीवरील कराच्या स्वरूपाचें देणें असल्यानें सुचविल्याप्रमाणें मध्यवर्ति सरकाराच्या करांचे बाबतींत तें हिशेबांत घेतां येणार नाहीं. म्युनिसिपल कर आणि मालमत्तेचें भाडें वसूल करण्यांत होणारा खर्च हीं प्राप्तीच्या रकमेमधून वगळावीं ही शिष्टमंडळाची विनंतिहि मान्य करतां येणार नाहीं असें उत्तर त्यास मिळालें. प्राप्तीवरील कराचा नवीन कायदा झाल्यापासून भाडेकरी नसल्यानें जागा रिकामी पडल्यास त्या बाबत आणि भाडेकऱ्यांच्या सुखसोयीसाठीं केलेल्या खर्चाबाबत प्राप्तीवरील कराच्या आकारणींत जरूर त्या रकमा वजा घालण्यांत येत नाहींत अशी तक्रार मालकांच्या वतीनें करण्यांत आली होती. ह्यांपैकीं पहिल्या बाबीचे संबंधांत प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत योग्य ती दुरुस्ती होण्याचा संभव आहे असें मि. शीही म्हणाले. भाडेकऱ्यांकरितां केलेल्या खर्चाची बाब लक्षांत घेतली जाण्याविषयीं व्यवस्था करण्यांत येईल असें आश्वासन त्यांनीं दिलें.

### युद्धाच्या हालचाली

गेल्या आठवड्यांत जर्मन विमानांनीं लंडनवर निकराचे हल्ले सारखे चालू ठेवले होते. शत्रूच्या त्या पूर्वीच्या प्रयत्नांस फारसें यश आलें नव्हतें आणि त्यास अनेक विमानांस व वैमानिकांस मुकावें लागलें होतें. ह्या अपयशानें चिडून जाऊन हिटलरनें विमानांच्या झुंडीच्या झुंडी इंग्लंडवर पाठवण्याचा सपाटा चालू ठेवला. ब्रिटिश विमानांनीं बर्लिनमधील युद्धोपयोगी आणि मोक्याच्या ठिकाणांवर ओळीनें दररोज बाँबचा वर्षाव केला त्याच्या पूर्वींच बिनलष्करी घरें व माणसें ह्यांच्यावर लंडनमध्यें बाँब फेकण्याचा क्रम शत्रूच्या विमानांनीं चालू ठेवलाच होता. आपले अलीकडचे हल्ले ब्रिटिशांच्या बर्लिनवरील हल्ल्यांस उत्तरादाखल आहेत असा बहाणा हिटलरनें केला आहे. वाटेल तेथें बाँब फेकण्याच्या जर्मन कृत्याचें समर्थन करण्याचा हा यत्न आहे, पण तो निष्फळ आहे. बिनलष्करी ठिकाणें व माणसें ह्यांवर बाँब फेकून लंडनच्या रहिवाशांस घाबरवून सोडावयाचें हा हिटलरचा उद्देश प्रथमपासून उघड दिसत होता. परंतु ब्रिटिश जनता शत्रु-विमानांच्या जाळपोळीस अत्यंत शांततेनें व धिमेपणानें तोंड देत आहे; एवढेंच नव्हे, तर इंग्लंडवर चारहि बाजूंनीं एकदम स्वारी करण्याची हिटलरची तयारी चालली असल्याविषयींची सूचना मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या लोकांस स्पष्टपणें दिली आहे. इंग्लंडवर व्हावयाच्या स्वारीच्या तयारीसाठीं जर्मन जहाजें व फौजा ह्यांची जमवाजमव होत आहे. ती वेळींच उधळून टाकण्याचें काम ब्रिटिश विमानें पद्धतशीर रीतीनें करीत आहेत. ब्रिटिश खाडीवरील फ्रेंच बंदरें, त्यांच्या दिशेनें जाणाऱ्या आगगाड्या, लढाऊ सामानाचे जर्मनीमधील साठे व कारखाने ह्यांचेवर अखंड मारा दररोज चाललेला आहे. ब्रिटिश विमानांच्या हल्ल्यांचा प्रसाद इटालिअन लढाऊ कारखान्यांसहि मिळाला आहे. इटालिअन फौजा इजिप्त व सुदान ह्यांच्या सरहद्दीवर जमा होत असल्याच्या बातम्या अलीकडे आल्या आहेत. पण त्यांचें यथायोग्य स्वागत करण्याची तयारी ब्रिटिश व इजिप्शन फौजांनीं अगोदरच केली आहे.

### जर्मन विमानांचे लंडनमधील अत्याचार

बकिंगहॅम राजवाड्याच्या आवारांत जर्मन विमानांनीं बाँब टाकले आणि त्यांपासून थोडेसें नुकसान झालें. परंतु जॉर्ज बादशहा आणि महाराणी ह्यांचा ह्या दिव्यापासून बचाव झाला ह्याविषयीं जगांत सर्वत्र समाधान व्यक्त करण्यांत येत आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळानें त्यांस अभिनंदनपर संदेश पाठविला आणि त्याच प्रकारचे संदेश त्यांचेकडे चोहोंकडून जात आहेत. ह्या संदेशांस बादशहांनीं पाठविलेलें उत्तर नमुनेदार आणि मार्मिक आहे. आपल्या हजारों प्रजाजनांसहि शत्रूच्या रानटी हिंस्रपणाचा अनुभव प्रत्यहीं येत आहे आणि त्याचा मासला आज स्वतःस मिळाला, परंतु त्याचे योगानें शत्रूचा प्रतिकार आणि पारिपत्य करण्याचा आपणां सर्वांचा निश्चय दृढ होणार आहे, हे राजेसाहेबांचे उद्गार इंग्लंडमध्यें व त्या देशाचे बाहेर लोकांच्या हृदयाचा ठाव घेतल्यावांचून रहाणार नाहींत. लंडनमध्यें हिटलरचीं विमानें धुमाकूळ घालीत आहेत आणि बिनलढाऊ जनतेच्या प्राणांचे बळी घेत आहेत. ह्याचा परिणाम हिटलरच्या कल्पनेपेक्षा निराळा होत आहे. लंडन शहराची नासधूस झाली म्हणजे तेथील रहिवासी आणि ब्रिटिश कारभारी मंडळ तें सोडून जातील; आणि ब्रिटिश राजधानी ह्याप्रमाणें रिकामी होणें म्हणजे इंग्लंडचा पराजय होणें होय अशी हिटलरची समजूत झालेली दिसते. पण ती किती भ्रामक आहे हें त्यास लवकरच कळून येईल. लंडनच्या संरक्षणासाठी नव्या आणि अधिक कार्यक्षम उपायांची योजना अमलांत आली आहे आणि हिटलरी अत्याचारांचे योगानें सबंद ब्रिटिश जनतेस विशेष स्फुरण चढलें आहे. हिटलरच्या लंडनमधील अमानुष लीलांचा परिणाम इंग्लंडविषयीं जगाची सहानुभूति वाढण्यांत झाला असून तो ह्या मार्गानें स्वतःच्या नाशाचा काळ जवळ ओढून घेत आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

### कामाच्या वेळांत बदल

बँकेचे भागीदार, खातेदार व बँकेशीं संबंध येणाऱ्या सर्व लोकांस विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं, बँकेच्या मुख्य कचेरीच्या कामाची वेळ शनिवार व सुटीचे दिवस खेरीज करून दुपारीं १० ते ४ पर्यंत होती, ती मंगळवार ता. १ ऑक्टोबर १९४० पासून

**[ दुपारीं १० ते ३॥ वाजेपर्यंत ]**

करण्यांत आली आहे. शनिवारीं नेहमींचीच वेळ म्हणजे दुपारीं १० ते १ वाजेपर्यंत राहील.

पुणें शहर, ता. २७-८-१९४०

बोर्डाच्या हुकुमावरून
एम्. व्ही. गोखले
मॅनेजर

## गिलिगन फार्मला व्हाइसरॉयांची भेट

### गुरांचें, कोंबड्यांचें व शेतकीचें प्रदर्शन

व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो, यांनीं जळगांव तालुका डेव्ह. ॲग्रि. असोसिएशननें चालविलेल्या गिलीगन कॅटल ब्रिडिंग फार्मला ता. १८-८-४० रोजीं भेट दिली.

प्रथम व्हाइसरॉयसाहेब व संस्थेच्या कार्यकारी मंडळीची ओळख झालेवर मि. ब्रुइन यांनीं गिलिगन कॅटल ब्रिडिंगच्या प्रदर्शनांत ठेविलेलीं ४० जनावरें क्रमाक्रमानें व त्याचप्रमाणें शेतकऱ्यांनीं आणलेलीं १६० व फार्मावरून दिलेल्या वळूपासून झालेली पैदास यांची फार्मच्या जनावरांबरोबर तुलनात्मक माहिती व्हाइसरॉयसाहेबांस दिली. या संस्थेसारख्या को-आपरेटिव्ह कायद्याखालीं रजिष्टर संस्था इतर इलाख्यांत कां काढत नाहींत वगैरेबद्दल त्यांनीं चौकशी केली. फार्मचीं जनावरें पाहून त्यांनीं आपलें समाधान व्यक्त केलें. शेतकरी आपलीं जनावरें त्याप्रमाणें सुधारत आहेत, हें पाहून तर त्यांस संतोष झाला. प्रदर्शनाबरोबर लहानसें कोंबड्यांचें प्रदर्शन ठेविण्यांत आलें होतें. लेगहार्न कोंबड्यांच्या ग्रेडेड अंड्यांपैकीं कांहीं अंडीं हातांत घेऊन तीं किती वजनदार आहेत हें त्यांनीं पाहिलें. नंतर चालू असलेलें स्क्रीम सेपरेटर पाहून शेतकीच्या विभागांत प्रवेश केला. असि. रजिस्ट्रार श्री. नाईक यांनीं या विभागाची त्यांना माहिती दिली. नंतर त्यांना त्या विभागांतील जिन्नस दाखवून खानदेशांतील प्रसिद्ध बसराई केळ्यांचे लोंगर दाखविण्यांत आले. तदनंतर खानदेशांतील सुधारलेल्या जरीला कपाशीबद्दल त्यांना श्री. नाईक यांनीं माहिती दिली. अशा रीतीनें त्यांनीं प्रदर्शन अवलोकन केल्यानंतर मुद्दाम उभारलेल्या भव्य मंडपांत प्रवेश केला.


संस्थेचे अध्यक्ष श्री. टी. बी. मोहिते यांनीं व्हाइसरॉय साहेब यांचें संस्थेतर्फे स्वागत केलें व संस्थेनें चालविलेल्या कामाचा गोषवारा थोडक्यांत सांगितला. व्हाइसरॉय साहेबांनीं संस्थेनें चालविलेल्या या कामाबद्दल प्रशंसेचे उद्गार काढले. हातीं घेतलेलें काम अव्याहत चालू ठेवण्याबद्दल संस्थेला उपदेश करून व त्याचप्रमाणें शेतकऱ्यांनीं या संस्थेचा फायदा घेऊन आपली गांवठी जनावरें सुधारावीं अशाबद्दल इंग्रजींत उपदेश केला. त्याचें मराठी भाषांतर श्री. चित्रे संस्थेचे सेक्रेटरी यांनीं लोकांना सांगितलें.

वरील प्रदर्शनांत सुमारें २०० जनावरें व कोंबड्या आल्या होत्या. त्याचप्रमाणें सुमारें २०० ते २५० धान्याचे व पिकांचे नमुने आले होते. त्यांत केळ्यांचे लोंगर पहाण्यासारखे होते. जरीला कपाशीचा विभाग फारच प्रेक्षणीय होता. याच सुमारास जळगांव येथें भरलेल्या सुपरवायझर्स व बँक इन्स्पेक्टर्स यांचा रिफ्रेशिंग क्लास भरला होता त्याची अनायासें माहिती त्यांनाहि देण्यांत आली. प्रदर्शन तारीख १८ व १९ असे दोन दिवस खुलें ठेवण्यांत आलें होतें. सुमारें ३,००० लोकांनीं हें प्रदर्शन पाहण्याची संधि साधली. प्रदर्शन पाहण्यास फी वगैरे नव्हती. उरलेलीं बक्षिसें दुसरे दिवशीं वांटण्यांत आलीं.


## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा मोठा आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. ११ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. [illegible] पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल कि. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. १७ (A. P.) अमृतसर (India.)

# युद्धांतील यशाचें रहस्य

## आर्थिक दमदारपणा

("अग्रणी"च्या ता. १६-९-४० च्या विशेषांकांतील प्रो. वा. गो. काळे ह्यांचा लेख.)

"युद्धांत फौजा आपल्या पोटांनीं (पायांनीं नव्हे) चालतात" ह्या विधानाची सत्यता नेपोलियनच्या काळीं जेवढी होती तेवढी आजहि आहे. सेनानींचे डावपेंच आणि सैनिकांचें शौर्य ह्यांची आवश्यकता लढाई जिंकण्यास निर्विवाद असते. त्यांवाचून लढाईंत विजय मिळणें अशक्य आहे. तथापि, शस्त्रास्त्रें व अन्नसामुग्री ह्यांच्या पुरवठ्याच्या अभावीं शौर्य व बुद्धि हीं व्यर्थ जातात. चालू युद्धांतील अनुभवहि असें सांगतो. पोलंड, नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड व फ्रान्स ह्या देशांत हिटलरनें एकामागून एक झपाट्यानें विजय मिळविले. परंतु इंग्लंडशीं प्रत्यक्ष गांठ पडतांच आर्थिक सामर्थ्य कसास लागलें आणि मागच्या महायुद्धाप्रमाणें चालू युद्धांतहि तेंच शेवटीं निर्णायक ठरणार आहे. ज्याचा दम अधिक टिकेल तोच लढवय्या अखेरी बाजी मारणार हें सत्य प्रस्तुत युद्धांतहि सिद्ध होणार आहे.

### मागील अनुभवाचा उपयोग

गेल्या महायुद्धांत युद्धसाधनें व अन्नसामुग्री ह्यांच्या तुटवड्यामुळेंच जर्मनी टेकीस येऊन दोस्त राष्ट्रांना शरण जाणें त्यास भाग पडलें. ज्या वैगुण्यामुळें आपला एकवार पराजय झाला, तीं दूर करण्याची शिकस्त करूनच हिटलरनें चालू युद्ध आरंभिलें. कित्येक वर्षांच्या खटपटीनें त्यानें शस्त्रास्त्रांचा अगोदर मोठा संचय केला आणि अन्नसामुग्री व कारखान्यांत लागणारा कच्चा माल ह्यांची वाण भासणार नाहीं अशी व्यवस्था त्यानें केली. परंतु अल्पकाळांत निकालांत निघूं शकणाऱ्या युद्धासच ही तरतूद पुरी होईल याची जाणीव त्यास होती आणि आहे. "विद्युद्वेगानें झडप" घालून देश पादाक्रांत करण्याचें धोरण जर्मनीनें अंगीकारलें आहे त्याचें कारण हेंच आहे. दीर्घकालीन युद्धांत जर्मनी तग धरूं शकणार नाहीं ही गोष्ट इंग्लंडला माहीत होती आणि म्हणूनच शत्रूच्या व्यापाराची नाकेबंदी त्यानें प्रारंभापासून चालविली आहे. पादाक्रांत केलेल्या देशांतील अन्नसामुग्री, कच्चा माल व कारखाने ह्यांचा उपयोग स्वतःच्या लढाऊ गरजा भागविण्याकडे जर्मनी करीत आहे आणि ह्या रीतीनें ब्रिटिशांनीं केलेल्या व्यापाराच्या नाकेबंदीमुळें पडलेला खळगा भरून काढण्याचा त्याचा प्रयत्न आहे. ह्या धोरणाचा परिणाम युरोपांत दुष्काळ उत्पन्न होण्यांत झाला आहे आणि जर्मनीनें जिंकलेल्या देशांत त्या योगानें असमाधान आणि अस्वस्थता माजणें अपरिहार्य आहे. संधी मिळतांच जर्मनीच्या वर्चस्वाचें जूं हे देश झुगारून दिल्यावांचून रहाणार नाहींत, हें उघड आहे. युद्धसामुग्रीचा तुटवडा जाणवूं लागण्यापूर्वीच इंग्लंडवर जोराची स्वारी करण्याचें हिटलरचें धोरण कां आहे याचें रहस्य यावरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

### ग्रेट-ब्रिटनच्या नाकेबंदीचा अयशस्वी प्रयत्न

युद्ध-साधनें व अन्नसामुग्री ह्यांच्या पुरवठ्याचे बाबतींत अधिक काळपर्यंत तग कोण धरून राहतो, ह्यावर अखेरचा निर्णय अवलंबून राहणार ह्याची खात्री दोन्ही पक्षांस आहे. फ्रान्सचा किनारा ताब्यांत येतांच त्यावरील बंदरांचा उपयोग, इंग्लंडचा व्यापार अडविण्याकडे करण्याचें जर्मनीनें योजिलें आणि व्यापाराच्या नाकेबंदीचें ब्रिटिश अस्त्र आपण इंग्लंडवर उलटविणार अशी बढाई मारण्यास हिटलरनें प्रारंभ केला. कच्चा माल आणि खाण्यापिण्याचे जिन्नस ह्यांचा ग्रेटब्रिटनचा पुरवठा पुष्कळांशीं परदेशांतून होणाऱ्या आयातीवर अवलंबून आहे हें खरें आहे. परंतु ब्रिटिश आरमार इतकें प्रबळ आहे कीं, त्याच्या संरक्षणासाठीं ग्रेटब्रिटनच्या बंदरांमध्यें व्यापारी जहाजांची ये-जा जोरानें चालू आहे. त्याचप्रमाणें व्यापारी जहाजांचा पुरवठा इंग्लंडपाशीं एवढा आहे कीं, जर्मनीनें ग्रेटब्रिटनच्या नाकेबंदीचा कितीहि कसून प्रयत्न केला, तरी त्यांत त्यास यश मिळणें शक्य नाहीं. हिटलरची आशा फोल ठरली.

प्रारंभीं इंग्लंडपाशीं पुरेशीं लढाऊ विमानें नव्हतीं आणि स्वतःच्या विमानांच्या संख्याधिक्यावर हिटलरची भिस्त मुख्यत्वें करून होती. पण विमानांचें उत्पादन इंग्लंडमध्यें झपाट्यानें वाढलें आहे आणि अमेरिकेचें ह्या बाबतींत त्यास मिळणारें साहाय्य अत्यंत उपयुक्त ठरलें आहे. पाणबुड्या बोटींपेक्षांहि बाँब टाकणाऱ्या विमानांच्या मदतीनें आपण ब्रिटिश व्यापारांत गुंतणाऱ्या व्यापारी जहाजांचा नाश करून टाकूं अशी आशा हिटलरला वाटत होती. पण ती निष्फळ ठरली आहे. उलट, अमेरिका इंग्लंडला नुसतीं लढाऊ विमानें वाढत्या प्रमाणावर पुरवून थांबलेली नाहीं. ब्रिटनला पन्नास विनाशिका पुरविण्याच्या अमेरिकेनें नुकत्याच केलेल्या करारानें इंग्लंडचें नाविक बळ वाढलें आहे.

### पैशाचें बळच अखेर प्रभावी

ही गोष्ट सर्वसामान्यच आहे. त्याहि संबंधांत अमेरिकेचें चांगलें पाठबळ इंग्लंडला मिळत आहे. जर्मनीची ही बाजू उघड उघड लंगडी आहे. ब्रिटिश विमानदलानें जर्मन कारखाने, बंदरें, रॉकेल तेलाचे साठे व वाहतुकीचीं साधनें यांचेवर हल्ले चढवून त्यांचा नाश करण्याचा सपाटा चालविला आहे व तो जर्मनीस जाणवूं लागला आहे. आपलीं विमानें इंग्लंडवर मोठ्या जमावानें पाठवून ब्रिटिश जनतेस घाबरवून सोडावयाचें असा हिटलरचा बेत होता. परंतु इंग्रज लोकांनीं जर्मन हवाई-हल्ल्यांस धिमेपणानें तोंड दिल्यानें तो बेतहि फसला आहे. ह्या सर्व परिस्थितीचा अर्थ असा आहे कीं, प्रस्तुत युद्धांत लढण्याचा दम कोणाचा अधिक काळ टिकतो, ह्यावर त्याचा निकाल लागणार हें पुनः निश्चित झालें आहे; आणि ग्रेट ब्रिटन व त्या राष्ट्राचे सहकारी यांचें आर्थिक बळ प्रभावी ठरून जर्मनीचा पाडाव होणार याविषयीं शंका उरलेली नाहीं.

इंग्लंडचें आरमार, त्याचीं व्यापारी जहाजें, त्याचीं संपत्तीची अमर्याद साधनें, त्याचा विस्तृत साम्राज्याचें मनुष्यबळ इत्यादि प्रकारचें ग्रेटब्रिटनचें आर्थिक सामर्थ्य प्रचंड आहे, ही गोष्ट हिटलरला माहीत असल्यानें त्या शक्तीचा उपयोग करण्यास ब्रिटिशांस अवसरच यावयाचा नाहीं असा त्याच्या धोरणाचा मुख्य हेतु होता. परंतु गेल्या वर्षांत ग्रेट ब्रिटनचें सामर्थ्य कमी न होतां उलट वाढलें आहे. जर्मन विमानें व पाणबुड्या यांस न जुमानतां ब्रिटिश व्यापारी जहाजें कच्च्या-पक्क्या मालाची आयात-निर्गत मोठ्या प्रमाणावर बिनदिक्कत करीत आहेत, ब्रिटिश साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून इंग्लंडला भरपूर आर्थिक साहाय्य मिळत आहे. दारूगोळा व इतर युद्धोपयोगी सामुग्रीचें उत्पादन हिंदुस्थानांत पद्धतशीर रीतीनें वाढविलें जात आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील पूर्व भागांतल्या देशांच्या प्रतिनिधींची एक परिषद् दिल्ली येथें पुढच्या महिन्यांत भरणार असून युद्ध-सामुग्रीचा पुरवठा कार्यक्षम रीतीनें

(पृ. ४५३ पहा)

# मुंबई प्रांताची औद्योगिक प्रगति कशी होईल ?

## ठाकूरदास कमिटीचा रिपोर्ट

(१)

मुंबई प्रांतांतील लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांची पहाणी करण्यासाठीं मुंबई सरकारनें एप्रिल, १९३८ मध्यें सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली होती. उद्योग-खात्याचे डायरेक्टर, श्री. सी. एन. वकील, डॉ. पी. यू. पाटील, मि. महंमदअली हबीब व डॉ. व्ही. के. आर. राव हे तिचे सभासद होते. ह्या कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्याचा पूर्वार्ध खालीं दिला आहे. शिफारसींचा सारांश पुढील अंकीं देण्यांत येईल.

### सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति

" मुंबई प्रांताची लोकसंख्या १ कोटि, ८० लक्ष आहे, त्यापैकीं ४२ लक्ष लोक शहरांत रहातात व १ कोटि, ३८ लक्ष लोक खेडेगांवांत रहातात. साक्षरतेचें प्रमाण दर हजारी ९९ सुद्धां पडत नाहीं. मुंबई प्रांतांतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति इतर प्रांतांतील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा भिन्न नाहीं. मुंबई प्रांतांत एकूण ४,०३७ सहकारी सोसायट्या असून त्यांचें खेळतें भांडवल सुमारें १½ कोटि रुपये आहे. सर्व प्रांतांपेक्षां मुंबई प्रांतांत प्राप्तीवरील कर भरणारांची संख्या मोठी आहे, व संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या पोस्टांतील ठेवी, आणि कारखान्यांतील कामगारांची संख्या ह्या बाबतींतहि मुंबई प्रांत अग्रेसर आहे.

" व्यापाराचे दृष्टीनेंहि मुंबईचें महत्त्व मोठें आहे. १९३७-३८ मध्यें त्याच्या आयात व्यापाराची किंमत ७२½ कोटि रुपये व निर्गत व्यापाराची किंमत ३३½ कोटि रुपये भरली. हिंदुस्थानच्या एकूण परराष्ट्रीय व्यापाराचे मानानें हा व्यापार ३०% भरतो. इतर प्रांतांचे मानानें मुंबई प्रांताची परिस्थिति थोडीशी बरी असली, तरी ती परिस्थिति खचित समाधानकारक नाहीं. २७१ मध्यें फक्त एका मनुष्याची वार्षिक प्राप्ति २ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे! प्राप्तीवरील कराचे आकारणींत शेतीच्या उत्पन्नाचा समावेश होत नाहीं; तथापि तो केला तरी २ हजार रुपयांपेक्षां अधिक वार्षिक उत्पन्न असणारांची संख्या ३०% ते ४०% पेक्षा अधिक वाढणार नाहीं. मुंबई प्रांताचें शेतीवरील अवलंबन फार मोठें असून जगांतील औद्योगिक राष्ट्रांचे मानानें हा प्रांत उद्योगधंद्यांत अतिशयच मागासलेला आहे.

" खेडेगांवीं उद्योगधंद्यांवर पोट भरणारांची संख्या कमी झाली आहे, परंतु नोंदलेल्या कारखान्यांतील कामगारांची संख्या वाढून ती १९३८ मध्यें ४ लक्ष, ७९ हजार इतकी झाली. शेतकऱ्यांस धंद्याहि पूर्वीसारखा उरलेला नाहीं. सूत काढणें, हातानें सरकी काढणें, भात कांडणें, दळणें, हातमागावर विणणें, इत्यादि जोडधंदे नाहींसे झाले असून त्यामुळें शेतकऱ्यांच्या सरासरी प्राप्तीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. १९३१ सालाच्या शिरगणतींत, उद्योगधंद्यांतील कामगारांचे यादींत ८ लक्ष, ७७ हजार लोकांचा समावेश आहे, त्यापैकीं फक्त २ लक्ष, ८० हजार लोक खेडेगांवीं व लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांत गुंतलेले असल्याचें आढळलें. कापड तयार करण्याचा धंदा हा मुंबई प्रांतांतील प्रमुख धंदा आहे व त्यांत सूत कातणाऱ्या व कापड विणणाऱ्या मोठ्या गिरण्या, यंत्रांवर चालणाऱ्या मागांच्या, लहान आकाराच्या गिरण्या, व हातमागाचा धंदा ह्यांचा त्यांत समावेश होतो. एक लाखापेक्षां अधिक हातमाग चालू नाहींत व त्यांवर दरसाल १८½ कोटि वार कापड निघतें. मोठ्या गिरण्यांतून एकूण ५६½ लक्ष चात्या व १½ लक्ष माग आहेत व त्यांत २½ अब्जांपेक्षां अधिक कापडाचें उत्पादन होतें.

### खेडेगांवीं उद्योगधंद्यांच्या मार्गांतील अडचणी

" कच्च्या मालाच्या पुरवठ्याचा अभाव, यंत्रसामुग्रीची चांगलें व पुष्कळ काम देण्याची अपात्रता, भांडवलाचा अभाव, माल खपविण्याची असमर्थता व कराचा भार, ह्या खेडेगांवांतील उद्योगधंद्यांच्या मार्गांतील प्रमुख अडचणी आहेत. मालाची निर्गत करणारा व्यापारी व मोठा कारखानदार ह्यांनीं कच्चा माल निवडून घेऊन जो माल उरेल तो हलक्या प्रतीचा माल खेडेगांवच्या कामकऱ्यांस मिळतो. कांहीं दलाल चांगल्या मालांत वाईट मालाची भेसळ करून खेडेगांवी लोकांस फसवितात. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या कारखानदारांसहि ही अडचण थोडीफार भासली, तरी त्यास माल मिळविण्याची दुसरीकडे खटपट करण्यास सवड व अनुकूल साधनें हीं असतात.

### उत्पन्नांत घट

" खेडेगांवी कामकऱ्यांचें उत्पन्न अतिशय घटलें आहे. यंत्रसामुग्री व उत्पादनपद्धति हीं पूर्वी प्रमाणेंच राहिलीं आहेत. सरकारी संघटित प्रयत्न ह्या बाबतींत झालेला नाहीं. कांहीं यंत्रसामुग्रींत सुधारणा सुचविण्यांत आली असली, तरी गरीब, खेडेगांवी कामकऱ्यास त्याचा फायदा कसा घेतां येईल, हा प्रश्न सुटलेला नाहीं. यंत्रसामुग्रीच्या व उत्पादनच्या सुधारणेचा प्रश्न मालाच्या उठावाशीं व भांडवलाच्या पुरवठ्याशीं संलग्न आहे. यंत्रांवर उत्पादन करणाऱ्या मोठ्या कारखान्यांत रोज नव्या सुधारणा होत आहेत व त्यामुळें उत्पादनखर्चांत घट होऊन ह्यामुळें खेडेगांवी कामगारांची स्पर्धा सहन करण्याची शक्ति रसातळास पोचली आहे.

### मालाचा उठाव

" खेडेगांवी उद्योगधंद्यांचा माल विकण्याचें कामहि अति बिकट आहे. गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडी बदलल्या आहेत व खेडेगांवांत तयार होणारा माल यंत्रांवर निघणाऱ्या मालाइतका सुबक असूं शकत नाहीं. उत्पादनाच्या खर्चाची बाबहि त्यास प्रतिकूल असते. विक्रीची व्यवस्था पुरातन काळापासून चालत आलेली असते, तींत सुधारणा होत नाहीं व तिचें तंत्रहि निर्माण होत नाहीं. खेडेगांवी उद्योगधंद्यांस भासणाऱ्या अडचणी लहान प्रमाणावरील कारखान्यांसहि अनुभवास येत असल्या, तरी त्यांचेपुढील प्रश्न नेहेमीच सारख्या तऱ्हेचे नसतात. तज्ञांच्या सल्ल्याचा अभाव, हें लहान कारखान्यांच्या अडचणीचें वैशिष्ट्य आहे. स्पर्धा—विशेषतः आयात मालाची स्पर्धा—त्यांस फार जाणवते. मागणीचें बदलतें स्वरूप त्यांस सतत कळूं शकेल, अशी कांहीं तरी व्यवस्था असणें आवश्यक आहे. त्यांचें स्वतःचें भांडवल बेताचेंच असतें आणि प्रांतिक सरकारांकडून आपल्या मालास प्रसिद्धि मिळून त्याचा प्रचार व्हावा अशी त्यांची अपेक्षा असते.

### प्रांतिक सरकारचें धोरण

" प्रांतिक सरकारचें औद्योगिक धोरण आजवर तटस्थपणाचें आहे. १९१७ सालीं मुंबई प्रांतांत उद्योग खातें निर्माण करण्यांत

आलें, तोंपर्यंत उद्योगधंद्यांविषयीं विचार करणारें खातें अस्तित्वांत नव्हतें. काटकसरीच्या सबबीवर हें खातें बंद पडण्याची पाळी अनेकांवर आली होती. ह्या खात्याचे वाटणीस फारच थोडी रकम येते. सर्वच प्रांतांत ही परिस्थिति आढळते, परंतु मुंबई प्रांतांत ती विशेषेंकरून लक्षांत येते. उद्योग खात्याच्या वाटणीस येणारी रकम प्रचार व शिक्षण ह्यांवर खर्च होते, परंतु विक्रीची व्यवस्था, भांडवलाचा पुरवठा व संशोधन ह्यांचे वाटणीस फारशी रकम येत नाहीं. आर्थिक घडामोडींशीं संबंध असणाऱ्या इतर खात्यांनींहि आर्थिक सुधारणेबाबत विशिष्ट धोरण आखलेलें दिसत नाहीं. शेतकी खात्याचे डायरेक्टर, उद्योग खात्याचे डायरेक्टर, सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, जंगल खात्याचे प्रमुख, गव्हर्मेंट स्टेशनरी व प्रिंटिंग प्रेसचे सुपरिंटेंडेंट व चीफ इंजीनिअर ह्यांचेमध्यें विचार-विनिमय वारंवार व्हावा, अशी योजना व व्यवस्था नाहीं."

## औद्योगिक प्रगतीची संधी

### प्रो. काळे ह्यांचें पालघर येथें व्याख्यान

"धार्मिक स्वरूपाच्या उत्सवांत तत्त्वज्ञान, वेदांत, नीति इत्यादि विषय सोडून पोटापाण्याच्या व द्रव्याच्या प्रश्नांवर भाषण करणें कित्येकांस विपरीत भासण्याचा संभव आहे. धर्माचा व उद्योग-धंद्यांचा संबंध काय? असें कांहीं जणांस वाटेल. हिंदुस्थानांतील जनता धार्मिक व पारमार्थिक वृत्तीची असल्यानें येथें मोठे व आधुनिक पद्धतीचे धंदे चालणें शक्य नाहीं. ह्या प्रकारची समजूत पाश्चात्य लेखकांनीं करून घेतली आहे, आणि तिचा प्रतिध्वनी ह्या देशांत केव्हां केव्हां स्पष्ट ऐकूं येतो. पण ही कल्पना सर्वस्वी चुकलेली आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे." ह्या शब्दांत प्रस्तावना करून प्रो. काळे ह्यांनीं पालघर येथील गणेशोत्सवांत दिलेल्या व्याख्यानांत सध्याच्या परिस्थितींत स्वदेशी उद्योगधंद्यांचा विस्तार करण्यास कशी चांगली संधी आहे आणि तिचा योग्य उपयोग सरकार आणि जनता ह्यांनीं कसा केला पाहिजे हें विशद करून सांगितलें. समाज सुसंघटित व सुखी रहावा आणि त्या दिशेनें प्रत्येकानें यत्न करावा असें आमचा धर्म सांगत आला आहे. कृषि, वाणिज्य व कला ह्यांचें महत्त्व ह्या देशांत पूर्वापार मान्य करण्यांत आलेलें असून आधुनिक काळांत हिंदी जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचा मुख्य उपाय उद्योगधंद्यांची कास धरणें हाच आहे.

पंचवीस वर्षांमागच्या महायुद्धाचे परिणाम ह्या देशांत कांहीं नवीन व मोठ्या प्रमाणावरील धंदे निघण्यांत झाला. त्यापूर्वी औद्योगिक उन्नतीस सरकारनें जकातीच्या वगैरे उपायांनीं उत्तेजन देणें अनिष्ट आहे असें इंग्लंडमध्यें मत होतें. पण युद्धप्रसंगीं स्वसंरक्षणासाठी कित्येक धंदे स्वतःच्या मालकीचे असणें अगत्याचें आहे ह्याविषयीं खात्री पटून त्या देशांत रंग, साखर, रासायनिक द्रव्यें इत्यादींच्या कारखान्यांस ब्रिटिश सरकारानें बुद्धिपुरःसर सहाय दिलें. हिंदुस्थानांतहि लोखंड-पोलादाच्या धंद्याचा उगम मागील युद्धांत सापडतो. औद्योगिक संरक्षणाचें धोरण हिंदुस्थान सरकारनें हळुहळु अंगिकारलें. ह्याचा परिणाम असा झाला आहे, कीं हिंदी गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडानें मँचेस्टरच्या मालाची जागा घेतली आहे आणि स्वदेशी साखरेचें उत्पादन भरपूर होऊं लागल्याकारणानें तिनें जाव्हाच्या साखरेस खो दिला आहे. चालू युद्धाचे परिस्थितींत अनेक प्रकारांच्या लढाऊ मालास विलक्षण मागणी उत्पन्न झाली असून तो तयार करण्याचे कारखाने हिंदुस्थानांत चालू होण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासत आहे.

चालू युद्धासारख्या युद्धांत आयात-निर्गत व्यापाराची घडी विस्कळित होणें साहजिकच आहे. शेंगदाण्यासारख्या गळिताच्या धान्याचें उदाहरण घ्या. शांततेच्या काळीं हा हिंदी माल मोठ्या प्रमाणांत शत्रु राष्ट्रांत खपत असे. त्याला आतां तिकडची मागणी नसल्यानें त्याचे भाव उतरले आहेत. अशा जिनसांचा उपयोग नवीन तऱ्हेचा माल बनवण्याकडे होणें इष्ट आहे. सर्व जग शांततेची अपेक्षा करीत असतां जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांनीं युद्धाची तयारी जोरानें चालवली होती. बाहेरून येणाऱ्या मालावांचून अडूं नये म्हणून त्यांनीं स्वदेशांत उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालापासून हरतऱ्हांचे जिन्नस बनवण्याचा उपक्रम केला. स्वदेश-संरक्षणाकरितां कांहीं जातींचा माल आपला आपण तयार केला पाहिजे ह्याची जाणीव युद्धानें दृढ केली आहे. हिंदुस्थानांत सायकली, मोटारी, रेल्वे इंजनें तयार करावीं अशी सूचना करणारा कांहीं वर्षांमागें मूर्ख ठरला असता. आतां ह्यापुढेंहि मजल गेली असून विमानें व आगबोटी बांधण्याचे स्वदेशी कारखाने स्थापण्याची भाषा सध्या ऐकूं येत आहे. युद्धसामुग्री तयार करण्यासाठी लहान मोठे धंदे ह्या देशांत चालू करतां येण्याजोगे आहेत आणि सरकारचें लक्ष त्यांचेकडे लागलें आहे. ह्याप्रसंगीं सरकार व जनता ह्यांनीं सहकार्य करून देशाच्या कायमच्या औद्योगिक उन्नतीस चालना दिली पाहिजे.

---

(पृ. ४५१ वरून समाप्त)

कसा करतां येईल ह्याविषयींची चर्चा तिच्यामध्यें होणार आहे. ह्यावरून जर्मनीचा पुरा पाडाव करण्याची तयारी दूरदृष्टीनें व विस्तृत प्रमाणावर कशी चालली आहे, त्याची कल्पना येईल. अमेरिकेच्या सहकारित्वाचा पाठिंबा ब्रिटिशांच्या आर्थिक संघटनेस उघड रीतीनें आतां मिळाल्याकारणानें युद्धाचा निकाल त्वरित रीतीनें आपल्यासारखा करण्याचा हिटलरचा मनोराज्याचा डोलारा डळमळूं लागला आहे. कोणत्याहि प्रकारच्या झुंजांत ज्याचा दम अगोदर उखडतो तो प्रतिस्पर्धी पराभूत होतो असा नियम आहे, आणि तोच प्रस्तुत युद्धास लागू होणार आहे. इंग्लंड व त्या राष्ट्रांचे सहकारी यांच्यामध्यें आर्थिक बळ मुळांतच मोठें आहे. आणि तें दिवसानुदिवस वृद्धिंगत होत आहे. त्यांतच हिटलरशाहीच्या नाशाचें बीज आहे.

---

### पोस्ट खात्याची नवी सवलत

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेच्या नियमांत एक दुरुस्ती करण्यांत आली आहे. तिच्या अन्वयें पोस्टल सेव्हिंग्ज बँकेंतून पैसे काढण्याच्या संबंधांतील कांहीं नियम सढळ झाले आहेत. ५ वर्षे मुदतीच्या पो. ऑ. कॅश सर्टिफिकेटांत पैसे गुंतविण्यासाठीं पैसे हवे असतील अगर मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या कर्जांत पैसे गुंतविण्याकरितां ते पाहिजे असतील, तर ते देण्याच्या बाबतींत अगोदर नोटीस वगैरेची मागणी केली जाणार नाहीं. मात्र, रोख रकम दिली न जातां पोस्टांतच अगर सरकारी ट्रेझरींत जमा-नांवे चे कागदी हिशेब केले जातील.

# सहकारी बँकांचे अहवाल

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

ह्या बँकेचें भाग भांडवल १२,९९,८५० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड १९,५४,९२१ रुपयांचे आहेत. थकलेल्या व्याजा-साठीं काढलेल्या फंडांत आवश्यकतेपेक्षा बरीच अधिक रकम होती, म्हणून त्यांपैकी १,२६,४५२ रुपये डायरेक्टरांनीं संशयित कर्ज फंडाकडे वर्ग केले. बँकेकडे एकूण सुमारें १ कोटि, ८५ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेजवळील रोख्यांची व भागांची मूळ किंमत ८१ लक्ष, १३ हजार रुपये आहे. त्याच्या घसाऱ्याची तरतूद बँकेनें केली आहे. सहकारी सोसायट्यांकडील व लिक्विडेशनमधील सोसायट्यांच्या येण्यांत अहवालाचे सालीं बरीच सुधारणा झाली आहे. विशेषतः डेक्कन कॅनॉल विभागांत परतफेड अधिक झाली, ह्याचें कारण, गुळास आलेला बरा भाव व वैयक्तिक कर्जदारांबेरोबर तडजोड करून त्यांस दिलेली सूट हें होय. ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टास गव्हर्नर जनरलची संमति मिळाली आहे. सहकारी संस्थांवर त्याचा काय परिणाम होतो, हें दिसण्यास अद्याप अवधि आहे. बँकेच्या ९५ हजारांच्या नफ्यांतून भागीदारांस २½% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं सुमारें ४६½ हजार रुपयांचा विनियोग व्हावयाचा आहे.

---

### कराड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ६६७ असून भाग भांडवल ३८,०२० रुपये आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड १५ हजार रुपयांवर असून इतर फंड १९ हजार रुपयांचे आहेत. बँकेकडे एकूण ३ लक्ष, ८३ हजारांच्या ठेवी आहेत. हातांतील शिलक व इतर बँकांतील शिलक मिळून सुमारें ६६ हजार रुपये व रोख्यांतील, भागांतील वगैरे मिळून ८८½ हजार रुपये, असे सुमारें १ लक्ष ५४ हजार रुपये तरते आहेत. मिळकत खरेदी सुमारें १२ हजारांची असून ३ लक्ष, ९½ हजार रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. अहवालाचे साल अखेर थकबाकीचें प्रमाण ८·८% आहे. लवाद केलेल्या दाव्यांचा हुकूमनामा बँकेच्या हातीं येण्यास लागणाऱ्या विलंबाचा उल्लेख बँकेच्या रिपोर्टांत आहे. पुणें येथील कॉसमॉस बँकेनेंहि अशीच तक्रार केली आहे, सहकारी खात्यानें ह्यासंबंधांत इष्ट ती व्यवस्था सत्वर करणें आवश्यक आहे. सिक्युरिटीज, इमारत व डेडस्टॉक यांसाठी ३,६०२ रुपये बाजूस काढूनच उरलेली नफ्याची रकम (७,७३८ रु.) ताळेबंदांत घेण्यांत आली आहे. ह्यापैकी २,८०० रुपयांचा विनियोग डिव्हिडंड वाटण्याकडे करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. कर्जबुड फंडांत ९०० रुपये व इमारत फंडांत १,००० रुपये टाकण्यांत यावयाचे आहेत. बँकेची परिस्थिति समाधानकारक आहे व तिची सालोसाल चांगली प्रगति होत आहे. दोन वर्षांत सुमारें १० हजारांनीं शेअर भांडवल वाढलें आहे, तें आणखी खपण्यास बँकेचा रिपोर्ट उपयोगी पडेल. बँकेची वार्षिक सभा २१-९-४० रोजीं आहे.

---

### बेळगांव पायोनियर अर्बन को. क्रे. बँक

ह्या बँकेच्या पटावर २,६११ सभासद असून तिचें वसूल भांडवल १ लक्ष, ४७ हजार रुपये आहे. गंगाजळी फंड १ लक्ष ४६½ हजारांचा, बूड व संशयित कर्जफंड ४५½ हजारांचा, इमारत फंड ४४½ हजारांचा, डिव्हिडंड ई. फंड ८½ हजारांचा, इन्व्हेस्टमेंट डि. फंड ६½ हजारांचा व घरें-शेती वगैरेबद्दल रिसर्व्ह फंड ९२ हजारांचा असे मजबूत फंड आहेत. बँकेकडे एकूण ९ लक्ष, ११½ हजारांच्या ठेवी आहेत. नवीन मुदती ठेवी न स्वीकारण्याचें बँकेचें अहवालाचे वर्षी धोरण होतें. एकूण १४ लक्ष, ४ हजारांच्या खेळत्या भांडवलापैकी १ लक्ष, ४६½ हजारांचें भाग भांडवल व २ लक्ष ५६ हजारांचे गंगाजळी व इतर फंड, ह्याप्रमाणें बँकेचें स्वतःचें ४ लक्ष रुपयांहून अधिक भांडवल आहे, ही परिस्थिति अत्यंत समाधानकारक आहे. बँकेच्या पैशापैकी मोठा भाग बँकांत व रोख्यांत आहे. एकूण ७ लक्ष, ५ हजारांचीं कर्जें बँकेकडे येणें आहेत. थकलेल्या कर्जांच्या रकमांचें प्रमाण मात्र यंदा जास्त वाढलें आहे. बँकेकडून ही बाकी वसूल करण्याचे कसून प्रयत्न होत आहेत. बँकेस एकूण वाटण्यासारखा नफा २६½ हजार रुपये राहिला त्यांतून भागीदारांस ७½% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ११ हजारांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेचें ऑफिस तिच्या स्वतःच्या इमारतींत २८-३-४० रोजीं गेलें. इमारत-खातीं ताळेबंदांत ४४,८७५ रुपयांची जिंदगी आहे. व्यवस्थित पद्धतीनें व्यवहार केल्यास कालांतरानें बँकेस मजबुती कशी प्राप्त होते, हें वरील बँकेच्या प्रगतीवरून दिसून येतें. बँकेची वार्षिक सभा ता. २२-९-४० रोजीं आहे.

---


**The Ayurveda Rasashala Poona Ltd.**

**DECCAN GYMKHANA, POONA 4.**

**NOTICE.**

Notice is hereby given that the Fifth Annual General Meeting of the share-holders of the Ayurveda Rasashala Poona Ltd. will be held at the Registered office of the Company, Deccan Gymkhana, Poona 4, on Sunday the 29th day of September 1940 at 5-30 P. M. (S. T.) to transact the following business—.

(1) To receive and adopt the Directors' Report and the audited and certified Balance Sheet and Profit and Loss Account for the peried ending 31st May 1940.

(2) To sanction the declaration of a Dividend.

(3) To elect directors in the place of three ritiring directors viz. (1) R. B. Seth Hanmantram Ramnath (2) Sjt. Mahadev Hari Kachare Patil (3) Sjt. D. K. Sathe, B. A., B. Sc. They are eligible for re-election.

(4) To appoint auditors for the current year and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be brought be fore the meeting by the consent of the chairman.

The Transfer books of the company will remain closed from 14th of September to 29th September both days inclusive.

By order of the Board of Directors.

R. S. MARATHE

9-9-1940 Secretary.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | ११२—३ |
| ४% १९४३ | १०४—६ |
| ३½% बिनमुदत | ९०—३ |
| ३½% १९४७–५० | १०१—४ |
| ३% (१९६३–६५) | ९०—१० |
| २½% १९४८–५२ | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०३—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१–६१) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १३४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०१—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ३५–१५ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १४८२—८ |
| बांबे मॉ. को. बँक (५०) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०१—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बांबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% | १२६–१२ |
| कराची (१००) ९% | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १३६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १५४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% | ९३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | ९९७—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% | ७७५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. | १८–१४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. | ३८—४ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २०१–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४०—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३२२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. १ पै. | १६५७—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | ११४—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४२–०–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३—०–० |

स्पृहणीय यश
कॉमनवेल्थचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल
हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५
आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

| *Work-Shop Address:* | *Branch No. 1* |
| --- | --- |
| 153 Kasaba, | Shevak Quarters, near Fergusson College |
| Poona 2 | Poona 4 |

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर
# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत अ. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाप्रवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.